महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वेतनश्रेणी रुपये १५६००-३९१०० ग्रेड पे रु. ६६००) विशेषज्ञ संवर्गातील “शरिरविकृती शास्त्रज्ञ” या पदावरील नामनिर्देशनाने झालेली शिफारस रद्द करण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः नामनि १२१७/प्र.क्र.२५०/सेवा-२

गो. ते. रुग्णालय आवार, दहावा मजला, मंत्रालय,
मुंबई- ४०० ००१
दिनांक : ०८ मार्च, २०१९

वाचा -

१. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्र. १९४(i) (ii) (४७)/ १७५६८/पंधरा-अ, दि. २२.०९.२०१७
२. शासनाचे समक्रमांक पत्र दि. २४.१०.२०१७
३. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद यांचे दि. २९.१२.२०१७ रोजीचे पत्र
४. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद यांचे दि. २६.०३.२०१८ रोजीचे पत्र
५. शासनाचे समक्रमांक दि. १३.०४.२०१८ रोजीचे पत्र
६. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद यांचे दि. १८.०५.२०१८ रोजीचे पत्र
७. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे दि. ०९.०१.२०१९ रोजीचे पत्र

शासन निर्णय -

संदर्भ क्र. १ अन्वये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वेतनश्रेणी रुपये १५६००-३९१०० ग्रेड पे रु. ६६००) विशेषज्ञ संवर्गातील “शरिरविकृती शास्त्रज्ञ” या पदावर नामनिर्देशनाने नियुक्तीबबात डॉ. सुनिता किसनराव शेरे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस प्राप्त झाली. संदर्भ क्र. २ नुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद यांना त्यांची वैद्यकीय तपासणी करुन वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करण्याबाबत पत्रान्वये कळविण्यात आले. संदर्भ क्र. ३ नुसार डॉ. शेरे यांना वैद्यकीय तपासणीसाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद यांनी दि. २९.०१.२०१८ रोजी उपस्थित राहण्याबाबत अवगत करण्यात आले होते. परंतु डॉ. शेरे वैद्यकीय तपासणीसाठी उपस्थित झाल्या नाहीत.

संदर्भ क्र. ४ नुसार डॉ. शेरे यांना पुनश्च वैद्यकीय तपासणीसाठी उपस्थित राहण्याबाबत अवगत करण्यात आले होते. संदर्भ क्र. ५ नुसार डॉ. शेरे यांना कळविण्यात आले होते की. दि. १६.०४.२०१८ रोजी दिलेल्या दिनांकास वैद्यकीय तपासणीसाठी उपस्थित न राहिल्यास व त्यांचे वैद्यकीय तपासणी करुन वैद्यकीय प्रमाणपत्र शासनास सादर न झाल्यास त्यांची शिफारस रद्द करण्यात येईल. सबब, डॉ. शेरे यांचे वैद्यकीय तपासणीचे प्रमाणपत्र आजपावेतो शासनप्राप्त झाले नाही. संदर्भ क्र. ६ नुसार डॉ. शेरे या दि. १६.०४.२०१८ रोजीही वैद्यकीय तपासणीसाठी उपस्थित झालेल्या नाहीत. डॉ. शेरे यांना वैद्यकीय तपासणीसाठी प्रतिक्षा करुन व वारंवार वैद्यकीय तपासणीस दिनांक अवगत करुनही संबंधित उमेदवार हे वैद्यकीय तपासणीसाठी उपस्थित झालेले नाहीत.

संदर्भ क्र. ७ नुसार वरील विषयाच्या अनुषंगाने विहित कालावधीत उमेदवाराने नियुक्ती न स्वीकारल्यास/ नियुक्तीपूर्वीच्या आवश्यक बाबींची/कागदपत्रांची पूर्तता न केल्यास संबंधित उमेदवाराचे नियुक्ती आदेश रद्द करण्यात यावे ही बाब शासन अखत्यारित आहे असे आयोगाने कळविले आहे. त्या अनुषंगाने डॉ. शेरे यांची महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वेतनश्रेणी रुपये १५६००-३९१०० ग्रेड पे रु. ६६००) विशेषज्ञ संवर्गातील “शरिरविकृती शास्त्रज्ञ” या पदावरील नामनिर्देशनाने झालेली शिफारस रद्द करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०८१४१९२८६३१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vishnudas Pundlikrao Ghodke

Digitally signed by Vishnudas Pundlikrao Ghodke
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=514c2e5ad6ac71c69b99a86a5fe5189556b7a95d5896bbb81496f403bb58ac3e, serialNumber=9ab69d6945f8950a9525831f8ae9726be295d17576e78d19fa8f6cb952bb04a0, cn=Vishnudas Pundlikrao Ghodke
Date: 2019.03.08 14:25:42 +05'30'

(वि. पुं. घोडके)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राद्वारे)
३. संचालक आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
४. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (सर्व)
५. सह संचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई
६. सह संचालक, आरोग्य सेवा (सर्व)
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
८. मा. मंत्री (सा.आ.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
९. मा. राज्यमंत्री (सा.आ.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१०. प्रधान सचिव (सा.आ.) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
११. सुनिता किसनराव शेरे फ्लॅट नं १८, वासुनंदाराव कॉलनी, नंदनवन परिसर, भवसिंगपूर रोड, ता. जि. औरंगाबाद
१२. निवडनस्ती (सेवा-२)